RNI No. MAHBIL/2009/35529

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ७, अंक ५] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी ४-१०, २०२१/माघ १५-२१, शके १९४२ [पृष्ठे २४ किंमत : रुपये १४.००

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

### जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई (१) शहर यांजकडून

**आदेश**

क्रमांक जिऊनि/मुंबई १/कक्ष ३/कलम १५६/आदेश/१५३१/२०२०.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, श्री. जे. डी. पाटील, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, मुंबई (१) शहर या आदेशान्वये कामगार एकता नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, ६/६१, म्युनिसिपल लेबर कॅम्प, नायगाव क्रॉस रोड, नायगाव, दादर (पूर्व), मुंबई ४०० ०१४ या संस्थेच्या खालील अधिकाऱ्यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व अन्वये प्राप्त वसूली प्रमाणपत्राची, कलम ९१ अन्वये मा. सहकार न्यायालयाकडील प्राप्त हुकूमनाम्याची ससेच कलम ९८ अन्वये प्राप्त प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्जवसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार, मालमत्तेची वाजवी किंमत निश्चितीचे अधिकार तसेच मालमत्ता विक्री कायम करण्याचे अधिकार वगळून खालील अटीस अधिन राहून दिनांक ३१ डिसेंबर २०२० ते दिनांक ३१ मार्च २०२१ या कालावधीकरिता प्रदान करीत आहे.

| अ. क्र. | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नाव | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री. विनोद धाकु गुडेकर | व्यवस्थापक | विशेष वसुली व विक्री अधिकारी | बृहन्मुंबई |

**अटी.—**

१. वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनूसार कर्जवसुलीची कार्यवाही करावी.

२. सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

३. वसुली अधिकारी यांनी दरमाह सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात प्रपत्र १, २, ३, ४ व ५ प्रमाणे कर्जवसुलीची माहिती संबंधित उप निबंधक/सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास सादर करावी.

४. अधिकार प्रदान केलेल्या वसूली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

५. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील दिनांक ६ एप्रिल २०१८ चे आदेशान्वये वसुली अधिकारी यांनी वसूल करावयाच्या हुकूमनाम्याच्या/वसुली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (Cost of Process) निश्चित केला असून त्यानुसार वसुलीच्या टप्प्यावर आदेशिकेचा खर्च संबंधित थकबाकीदारांकडून वसूल करावा. तसेच आदेशामध्ये निश्चित केलेल्या हुकूमनाम्याच्या/वसुलीच्या दाखल्याच्या आदेशिकेचा खर्चाच्या दराने वसूल करावयाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम थकबाकीदारांकडून वसूल करता येणार नाही.

६. मा. उच्च न्यायाल्य, मुंबई यांनी रिट याचिका क्र. १९४२/२०१३ दि बेसिन कॅथोलिक को-ऑप बँक विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये दिनांक ५ डिसेंबर २०१५ रोजी दिलेल्या आदेश विचारात घेऊन वसुलीची कार्यवाही करताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ प्राप्त असलेल्या अधिकारानुसारच वसुलीची कार्यवाही करावी.

७. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सुचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील. तसेच वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

८. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१५०४/प्र.क्र.२३१/१५-स दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

९. वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही महाराष्ट्र शासन नियुक्त आणि किंवा सिव्हील कोर्ट " एक्झीक्युटीव्ह कोर्ट " या शब्दाचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे " वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७) " असे लिहावे.

१०. वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर " वसुली अधिकारी " कामगार एकता नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, ६/६१, म्युनिसिपल लेबर कॅम्प, नायगांव क्रॉस रोड, नायगांव दादर (पूर्व), मुंबई ४०० ०१४. " असा फलक लावता येऊ शकेल.

११. वसुली अधिकाऱ्याने पगारजप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगारकपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

१२. वसुली अधिकाऱ्याने या कार्यालयाच्या दिनांक १ जानेवारी, २०१७ व दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ च्या परिपत्रकातील सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची आहे. सदर परिपत्रकातील सुचनांचे उल्लंघन झाल्यास वसुलीचे अधिकार काढून घेण्यात येऊन भविष्यकाळात असे अधिकार प्रदान केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

१३. कलम १०१ खालील वसुली दाखल्याप्रमाणे कर्जाची वसुली करताना प्रथम कर्जदाराकडील जंगम व स्थावर मालमत्ता, तद्नंतर प्रथम जामीनदाराकडील जंगम व स्थावर मालमत्ता व त्यानंतर पुढील जामीनदाराकडील जंगम व स्थावर मालमत्ता या क्रमाने कर्जवसुलीचे प्रक्रीया राबवावी.

**जे. डी. पाटील,**
जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, मुंबई (१) शहर.

मुंबई,
दिनांक ३० डिसेंबर २०२०.

## सहायक निबंधक, सहकारी संस्था, पनवेल यांजकडून

### ज्ञापन

क्रमांक सनिप/वि-२/मंदारयोग हौ./पोनिदु/मंजुरी/ /सन-२०२०/१६४९.— मंदारयोग को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड या संस्थेच्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १२ सप्टेंबर २०२० रोजी होऊन सदर सभेत संमत झालेल्या ठरावास अधीन राहून सहायक निबंधक संस्था, पनवेल, जि. रायगड हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १३ उप-कलम (२), कलम १५ व नियम १४ अन्वये खाली नमूद केलेली उप विधी दुरूस्ती मंजूर करीत आहे.

| अ.क्र. | उप विधी क्रमांक | दुरूस्त उप विधीची शब्दरचना |
|---|---|---|
| १ | उप विधी क्र. १ अ:संस्थेचे नाव | **मंजूर** सोबत जोडलेल्या पुरवणी क्र.४ नुसार संस्थेचे नाव **सुवर्णपुष्प सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित** असे राहील. |
| २<br>३ | उप विधी क्र.२अ:संस्थेचा नोंदणीकृत पत्ता<br>उप विधी क्र.२ब, संस्थेचा पत्रव्यवहाराचा पत्ता | **मंजूर** सोबत जोडलेल्या पुरवणी क्र. ४ नुसार संस्थेचा नोंदणीकृत पत्ता फा. प्लॉट नं.४५५/अ-१अ, ४५५/बी-१, ४५५/अ, ४५५/ब, ४५५/क, ४५८/ड, ४५५अ/१ब, ४६१पार्ट, ४५६.१, ४५६.२ टिळकरोड, पनवेल ४१० २०६. असा राहील. |
| ४ | उप विधी क्र.४:संस्थेचे कार्यक्षेत्र | **मंजूर** सोबत जोडलेल्या पुरवणी क्र.४ नुसार संस्थेचे कार्यक्षेत्र फा.प्लॉट नं.४५५/अ-१अ, ४५५/बी-१, ४५५/अ, ४५५/ब, ४५५/क, ४५८/ड, ४५५अ/१ब, ४६१ पार्ट, ४५६.१, ४५६.२ पुरते राहील. |
| ५ | उप विधी क्र.८ संस्थेचे अधिकृत भागभांडवल | **मंजूर** सोबत जोडलेल्या पुरवणी क्र.४ नुसार संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु. २४५०० एवढे राहील. सदर भागभांडवल प्रत्येकी रु. ५० रुपयाचा एक अशा ४९० भागात विभागले जाईल. |
| ६ | आदर्श उपविधी क्र. १ ते १७५.<br>(जोडपत्र व परिशिष्ठांसहीत) | **मंजूर**-सोबत जोडलेल्या पुरवणी क्र.४ नुसार |

या आदेशाची प्रत मंजूर उप विधीसोबत जोडून ठेवावी.

**बा. ना. वाघमारे,**
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, पनवेल.

पनवेल,
दिनांक ५ नोव्हेंबर २०२०.

## पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांजकडून

### आदेश

क्रमांक विशा/नायलॉन मांजा/मनाई आदेश/१६८/२०२१.— ज्याअर्थी, दरवर्षी बऱ्याच ठिकाणी " पतंग उत्सव " कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. दरम्यान असे निदर्शनास आले आहे कि, नायलॉन मांजा यामुळे पक्षी व मानवी जिवीतास इजा पोहचली जाते. त्यामुळे मानवी जिवीताचे तसेच पक्षांचे नायलॉन मांजा पासून संरक्षण करणे गरजेचे आहे.

(२) ज्याअर्थी, प्लास्टिक किंवा कृत्रिम वस्तुचा वापर करून बनविण्यात आलेल्या व सर्वसाधारणपणे " नायलॉन मांजा " हा अनाशवंत असल्याने तो बराच कालावधीकरीता निसर्गात तसाच राहतो. त्यामुळे पर्यावरणाला हानी पोहचते. हा मांजा अनाशवंत असल्यामुळे गटारे व नाले या ठिकाणी तसेच अडकून राहतो. त्यामुळे सार्वजनिक सांडपाणी व्यवस्था खराब होते. तसेच सदरचा मांजा हा जमिनीवर तसाच पडून राहिल्याने जनावरे विशेषतः गाई, म्हशी इत्यादी यांच्या पोटात जाऊन त्यांच्या जिवीतास धोका उत्पन्न होऊ शकतो.

(३) ज्याअर्थी, नायलॉन मांजा हा प्लास्टिक (नायलॉन) या कठीण पदार्थापासून बनविला जातो. पतंग उडविण्याच्या दरम्यान हा मांजा विद्युत वाहिनी तसेच उपकेंद्र या ठिकाणी अडकून राहून विद्युत पुरवठ्यामध्ये समस्या निर्माण करु शकतात. तसेच त्याद्वारे विद्युत उपकरणांमध्ये बिघाड होऊन दुर्घटना होण्याची शक्यता असते.

(४) ज्याअर्थी, आकाशात मुक्त विहार करणाऱ्या पक्षांच्या जिवीताची काळजी घेणे आवश्यक आहे. पक्षांच्या काही प्रजाती या दुर्मिळ असून त्या नामशेष होत आहेत. त्यांचे संवर्धन व जतन करणे गरजेचे आहे. मिरा-भाईदर, वसई विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात मकरसंक्रांती सणाच्या निमित्ताने मोठ्याप्रमाणत पतंगोत्सवाचे आयोजन केले जाते.

(५) त्याअर्थी, मी विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात प्लास्टिक व कृत्रिम साहित्य वापरुन तयार करण्यात आलेला " नायलॉन मांजा " ज्यामुळे पक्षी तसेच मानवी जिवीतास गंभीर दुखापत होण्याची शक्यता आहे अशा नायलॉन मांजाची उत्पादन, विक्री, साठवणूक व वापर यावर मनाई करीत आहे.

(६) सदरचा मनाई आदेश दिनांक १३ जानेवारी २०२१ रोजी ००.०१ पासून ते दिनांक ११ फेब्रुवारी २०२१ रोजी २४.०० वाजेपावेतो अंमलात राहील.

(७) सदर मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या इसमांवर भा.दं.वि.सं. कलम १८८ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

(८) सदर मनाई आदेशाने प्रभावीत होणाऱ्या व्यक्तींना स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१)(२) अन्वये सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, संबधित पोलीस स्टेशन, सहा.पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरचा आदेश माझ्या सहीशिक्क्यानिशी आज दिनांक १२ जानेवारी, २०२१ रोजी दिलेला आहे.

**विजयकांत सागर,**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय),
मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय.

मि.भा.,व-वि. आयुक्तालय,

## उप संचालक भूमि अभिलेख कोकण प्रदेश मुंबई यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक एकत्री/दु. एस. आर. ११२/अलिबाग/रायगड/२०२०.— मौजे टेकाळी (आवास) ता. अलिबाग, जि.रायगड येथील जमीन एकत्रीकरण योजना कायम करणेबाबतची अधिसूचना दि. १६ जुलै १९८७ चे **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग-१ पानांक ७१९ मध्ये प्रसिध्द झाली होती. सदरचे मंजूर योजनेत दुरूस्ती करणे आवश्यक असल्याची खात्री झाल्यामुळे मंजूर एकत्रीकरण योजनेतील खाते क्रमांक ९७२ गट नं. (जुना १३०८) नवीन १९१ यामध्ये दुरूस्ती योजना व त्याप्रमाणे नकाशा दुरूस्ती करणेबाबतच्या मसुद्यास उप संचालक, भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांनी मान्यता देऊन तो कायदा कलम ३२(१) अन्वये प्रसिध्दीसाठी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, रायगड यांचेकडे दिनांक १२ फेब्रुवारी २०२० रोजी पाठविणेत आला होता. त्यांनी सदरचा दुरूस्ती मसुदा गांवी तलाठी व तहसील कार्यालयाचे नोटीस बोर्डावर दिनांक २९ फेब्रुवारी २०२० रोजी प्रसिध्द केला होता. प्रसिध्दीचे कालावधीमध्ये एकही हरकत अर्ज प्राप्त झालेला नाही. सबब मुंबईचा धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणेबाबत व त्यांचे एकत्रीकरण करणेबाबत अधिनियम, १९४७ च्या कलम ३२ पोट-कलम ३ मधील तरतुदीनुसार उप संचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई हे मंजूर योजनेतील खाते क्रमांक ९७२ गट नं. (जुना १३०८) नवीन १९१ मध्ये फेरफार करून योजना व गट बुक दुरूस्तीचे प्रस्तावाचा मसुदा कायम करीत आहे.

**मिलिंद चव्हाण,**
उप संचालक भूमि अभिलेख,
कोकण प्रदेश, मुंबई.

मुंबई,
दिनांक २३ डिसेंबर २०२०.

## जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, मुंबई (१) शहर यांजकडून

### आदेश

क्रमांक जिऊनि १/मुंबई/निवडणूक/श्री जोमादेवी सह. पत/१६८१/२०२१.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ अअअ (५अ) व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम, २०१४ चे नियम ६४ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, जे. डी. पाटील, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, मुंबई (१) शहर, श्री जोमादेवी सहकारी पतपेढी लि. मुंबई, ३३८/ए/१०१, आमची सावली को-ऑप हौसिंग सोसायटी लि., ना.म. जोशी मार्ग, मुंबई ४०० ०११ या संस्थेचे खालील नमूद केलेले नवनिर्वाचित संचालक त्यांच्या नावासमोर नमूद केलेल्या मतदार संघातून सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या पाच वर्षांच्या कालावधीसाठी यथोचितरित्या नवनिर्वाचित संचालकांची समिती गठीत झाल्याचे जाहीर करीत आहे.

| अ. क्र. | उमेदवारांचे नाव | उमेदवारांचा पत्ता | मतदार संघ |
|---|---|---|---|
| १ | चव्हाण शंकर कृष्णा | १०३, ग्रीन पार्क, गोपाळ नगर, तिसगांव नाका, कल्याण (पूर्व), जि. ठाणे पीन ४२१ ३०६. | सर्वसाधारण |
| २ | कसलकर धनाजी गुंडू | १/४६, वाणी चाळ, पोद्दार मिलसमोर, ना. म. जोशी मार्ग, मुंबई ४०० ०११. | सर्वसाधारण |
| ३ | सावरतकर श्रीकांत आबाजी | ए-१३, गुरुकृपा चाळ, भांबरेकर नगर, चारकोप, कांदिवली (वेस्ट), प्रभात हॉटेलजवळ, मुंबई ४०० ०६७. | सर्वसाधारण |
| ४ | बिडकर प्रमोद जोतिबा | डी/२०१, सीता नगर, नवघर गोडदेव क्रॉस रोड, शिर्डी नगरसमोर, ठाणे-भायंदर (ईस्ट) पीन  ४०१ १०५. | सर्वसाधारण |
| ५ | सोनार संतोष रामदिन | ४४/८/११, साने गुरुजी नगर, बी कमिटी, जी. बी. सकपाळ मार्ग, सातरस्ता, धोबीघाट, आर्थर रोड जेलजवळ, मुंबई ४०० ०११. | सर्वसाधारण |
| ६ | चव्हाण ईश्वर बाळू | रुम नं. ५, जाधववाडी, एन. एस. मंकीकर मार्ग, सायन (पूर्व), मुंबई ४०० ०२२. | सर्वसाधारण |
| ७ | तळेगांवकर सुनिल बाबूराव | ३/२८/५४, गणेशनगर सीएसआर को-ऑप. हौ. सो. लि., जे. आर. बोरीचा मार्ग, कस्तुरबाजवळ, सातरस्ता, जेकब सर्कल, मुंबई-४०० ०११. | अनुसूचित जाती/जमाती |
|  | रिक्त पद | - - | इतर मागासवर्गीय |
| ८ | पुरी उदय चंद्रकांत | ए/२, उज्वला निवास, मोहिली व्हिलेज, साकीनाका, अंधेरी (पूर्व), लक्ष्मीनारायण मंदिराजवळ, साकीनाका, मुंबई ४०० ०७२ | भटक्या विमुक्त जाती/जमाती |
| ९ | बिडकर पल्लवी अनिल | द्वारा - अनिल बिडकर, फ्लॅट नं. १५, विजयालक्ष्मी को-ऑप. हौ. सो. लि., लाला लजपतराय मार्ग, डोंबिवली (पूर्व), कल्याण, जिल्हा-ठाणे पीन ४२१ २०१ | महिला राखीव |
| १० | चव्हाण लता रविंद्र | २१, ५/५, रिटा फर्नांडीस चाळ, साईबाबा नगर, टिचर्स कॉलनी जवळ, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१. | महिला राखीव |

सदरचा आदेश आज दिनांक १३ जानेवारी २०२१ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिला असे.

**जे. डी. पाटील,**
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा
जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, मुंबई (१) शहर.

## प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक रा.अ./१८८/२०२१.— श्री. एस. व्ही. स्वामी, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग, यांची दिनांक ११ जानेवारी २०२१ ते दिनांक १६ जानेवारी २०२१ अशी एकूण ०६ दिवसांची अर्जित रजा, मागील दिनांक ९ जानेवारी २०२१, दिनांक १० जानेवारी २०२१ व पुढील दिनांक १७ जानेवारी २०२१ रोजीच्या सुट्टीला जोडून तसेच दिनांक ८ जानेवारी २०२१ रोजीच्या का. वे. नं. पासून ते दिनांक १८ जानेवारी २०२१ रोजीच्या का. वे. पूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करण्यात येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. एस. व्ही. स्वामी, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग, येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. एस. व्ही. स्वामी, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग, या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

श्री. एस. व्ही. स्वामी, हे रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीतील त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. एल. जी. पाच्छे, दिवाणी न्यायाधीश व. स्तर अलिबाग यांजकडे राहील.

**वि. प्र. इंगळे,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक ६ जानेवारी २०२१.

## प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक रा.अ./२४०/२०२१.— श्रीमती पी. पी. बनकर, जिल्हा न्यायाधीश १ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, माणगाव, जि. रायगड यांची शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र. २५/सेवा-६, मंत्रालय, मुंबई दिनांक २३ जुलै २०१८ व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील पत्र कमांक Rule/P1604/2018/163, dated 21st August 2018 अन्वये दिनांक १३ जानेवारी २०२१ ते २२ जानेवारी २०२१ या कालावधीतील १० दिवसांची बालसंगोपन रजा, पुढील दिनांक २३ जानेवारी २०२१ व दिनांक २४ जानेवारी २०२१ रोजीच्या सुट्टीला जोडून, तसेच दिनांक १२ जानेवारी २०२१ रोजीच्या का.वे.नं. पासून ते दिनांक २५ जानेवारी २०२१ रोजीच्या का.वे. पूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती पी. पी. बनकर यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, माणगाव, जि. रायगड येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती पी. पी. बनकर ह्या जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, माणगाव, जि रायगड या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहील्या असत्या.

श्रीमती पी. पी. बनकर ह्या रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त न्यायिक अधिकारी जर गैरहजर असतील तर त्यांच्या न्यायालयाचा कार्यभार स्थायी आदेशाप्रमाणे राहील.

सदरहू रजेची नोंद संबंधित न्यायिक अधिकारी यांच्या सेवापुस्तकात ठेवण्यात यावी.

**विभा प्र. इंगळे,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक ७ जानेवारी २०२१.

## प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक रा.अ./१६९/२०२१.— श्रीमती एफ. एफ. ईराणी, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर उरण, यांची दिनांक १ जानेवारी २०२१ ते ३ जानेवारी २०२१ अशी एकूण ३ दिवसांची अर्जित रजा मंजूर करण्यात येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्रीमती एफ. एफ. ईराणी, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उरण येथे पुर्ननियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्रीमती एफ. एफ. ईराणी, ह्या जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेल्या नसत्या तर दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उरण या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिल्या असत्या.

श्रीमती एफ. एफ. ईराणी, ह्या रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. आर. बी. पोळ, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उरण यांजकडे राहील.

**विभा प्र. इंगळे,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक ५ जानेवारी २०२१.

## प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड-अलिबाग यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक रा.अ./१७०/२०२१.— श्री. ए. यु. बहिर, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल, यांची दिनांक १ जानेवारी २०२१ ते ३ जानेवारी २०२१ अशी तीन दिवसांची अर्जित रजा, दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजीच्या का.वे.नं. पासून ते दिनांक ४ जानेवारी २०२१ रोजीच्या का.वे.पूर्वीपर्यंत मुख्यालय सोडण्याच्या परवानगीसह मंजूर करणेत येत आहे.

पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता नाही.

श्री. ए. यु. बहिर, यांचा रजेचा कालावधी संपल्यानंतर त्यांची २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल येथे पुनर्नियुक्ती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ३९ नुसार प्रमाणित करणेत येत आहे की, श्री. ए. यु. बहिर, हे जर उपरोक्त कालावधीत रजेवर गेले नसते तर २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल या पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहीले असते.

श्री. ए. यु. बहिर, हे रजेवर जाण्यापूर्वी जे वेतन आहरित करीत आहेत त्याच दराने वेतन काढणेत यावे.

उपरोक्त कालावधीत त्यांचे न्यायालयाचा कार्यभार श्री. यु. एल. पाठक, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल यांजकडे राहील.

**विभा प्र. इंगळे,**
प्रमुख जिल्हा न्यायाधीश,
रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक ५ जानेवारी २०२१.

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांजकडून

### कार्यालयीन आदेश

क्रमांक बी-२/१८२/२०२१.— रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे. तसेच श्री. डी. एल. निकम, जिल्हा न्यायाधीश-२ व अति. सत्र न्यायाधीश, खेड यांनी अर्जामध्ये नमूद केलेल्या त्यांचे मुलीच्या वैद्यकीय कारणास्तव श्री. निकम यांना दिनांक १० जानेवारी २०२१ रोजीच्या कार्यशाळेला उपस्थित राहणेपासून विशेष बाब म्हणून सूट देण्यात येत आहे :—

| अ. क्र. | न्यायिक अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | शिल्लक अर्जित/ परिवर्तीत रजा | अर्जित/परिवर्तीत रजा मागितलेचा दिनांक | रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत) | अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | श्री. डी.एल. निकम, जिल्हा न्यायाधीश-२ व. अति. सत्र न्यायाधीश, खेड. | २०५ दिवस अर्जित रजा. | दिनांक ११ जानेवारी २०२१ ते दिनांक १३ जानेवारी २०२१ पर्यंत तीन दिवस अर्जित रजा. | दिनांक ९ जानेवारी २०२१ ते दिनांक १० जानेवारी २०२१ च्या सुट्ट्या. दिनांक ८ जानेवारी २०२१ रोजीचे कार्या. वेळेनंतरपासून ते दिनांक १४ जानेवारी २०२१ रोजीचे कार्या. वेळेपूर्वीपर्यंत. | श्री. ए. एस. आवटे, जिल्हा न्यायाधीश-१ व. अति. सत्र न्यायाधीश, खेड. |

रजेवरुन परत आल्यावर न्यायिक अधिकारी यांना त्यांचे पदावर पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरील प्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदावर पर्यायी अधिकाऱ्याची नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवणेत येत आहे. वरील न्यायिक अधिकारी हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

संबधित न्यायिक अधिकारी यांनी त्यांचे पदभारासंबधी त्यांचे न्यायालयाशी संलग्न असलेल्या पोलीस ठाण्याला व तुरुंगाधिकारी यांना लेखी सूचना द्याव्यात. तसेच त्यांनी मुख्यालयात हजर झालेचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबधित न्यायिक अधिकाऱ्यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

**एम. क्यु. एस. एम. शेख,**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक ६ जानेवारी २०२१.

# प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांजकडून

## कार्यालयीन आदेश

क्रमांक आस्था बी-२/५२६५/२०२०.— रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे. :—

| अ. क्र. | न्यायिक अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | शिल्लक अर्जित/ परिवर्तीत रजा | अर्जित/परिवर्तीत रजा मागितलेचा दिनांक | रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा/कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत) | अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | श्रीमती की. आ. काटकर, सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) व न्यायदंडाधिकारी वर्ग १, दापोली. | २९ दिवस अर्जित रजा. | दिनांक ७ डिसेंबर २०२० ते दिनांक १० डिसेंबर २०२० पर्यंत ४ दिवस अर्जित रजा. | दिनांक ७ डिसेंबर २०२० रोजीचे कार्या. वेळेपासून ते दिनांक ११ डिसेंबर २०२० रोजीचे कार्या. वेळेपूर्वीपर्यंत मुख्यालय सोडणेची परवानगी. | श्री. यु. एस. जाधव, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) व न्यायदंडाधिकारी वर्ग १, दापोली. |

रजेवरुन परत आल्यावर न्यायिक अधिकारी यांना त्यांचे पदावर पुर्ननियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदावर पर्यायी अधिकाऱ्याची नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवणेत येत आहे. वरील न्यायिक अधिकारी हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

संबधित न्यायिक अधिकारी यांनी त्यांचे पदभारासंबधी त्यांचे न्यायालयाशी संलग्न असलेल्या पोलीस ठाण्याला व तुरुंगाधिकारी यांना लेखी सूचना दयाव्यात. तसेच त्यांनी मुख्यालयात हजर झालेचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबधित न्यायिक अधिकाऱ्यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

**एम. क्यु. एस. एम. शेख,**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक ७ डिसेंबर २०२०.

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी यांजकडून

### कार्यालयीन आदेश

क्रमांक बी-२/७८/२०२१.— रत्नागिरी जिल्ह्यात कार्यरत असलेल्या खालील न्यायिक अधिकारी यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अर्जित रजेचा अर्ज मंजूर करीत आहे. तसेच रकाना क्रमांक ६ मधील न्यायिक अधिकारी यांचेकडे कार्यभार ठेवणेत येत आहे. :—

| अ. क्र. | न्यायिक अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | शिल्लक अर्जित रजा | अर्जित/परिवर्तीत रजा मागितलेचा दिनांक | रजा/सुट्टी उपभोगणेचा व मुख्यालय सोडणेचा/कालावधी (कार्यालयीन वेळेनंतर ते कार्यालयीन वेळेपूर्वीपर्यंत) | अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे न्यायिक अधिकारी यांचे नाव व पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | श्री. जी. जी. इटकळकर, मुख्य न्यायदंडाधिकारी रत्नागिरी. | १७५ दिवस अर्जित रजा. | दिनांक ५ जानेवारी २०२१ ते दिनांक ८ जानेवारी २०२१ पर्यंत ४ दिवस अर्जित रजा. | ——— दिनांक ४ जानेवारी २०२१ चे कार्या. वेळेनंतरपासून ते दिनांक ९ जानेवारी २०२१ चे कार्या. वेळेपूर्वीपर्यंत | दिनांक ४ जानेवारी २०२१ चे कार्या. वेळेनंतरपासून ते दिनांक ७ जानेवारी २०२१ चे कार्या. वेळेपूर्वीपर्यंत श्री. डि. एस. झंवर, दिवाणी न्यायधीश, व. स्तर, रत्नागिरी यांजकडे **** |

**** तसेच दिनांक ७ जानेवारी २०२१ चे कार्या.वेळेपासून ते दिनांक ९ जानेवारी २०२१चे कार्या.वेळेपूर्वीपर्यंत श्री एस.एन.सरडे, सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर व अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे ठेवणेत येत आहे.

रजेवरून परत आल्यावर न्यायिक अधिकारी यांना त्यांचे पदावर पुनर्नियुक्त करणेत येत आहे. तसेच वरीलप्रमाणे रजेच्या कालावधीत त्यांचे पदावर पर्यायी अधिकाऱ्याची नेमणुकीची आवश्यकता नसल्याने सदरचे पद रिक्त ठेवणेत येत आहे. वरील न्यायिक अधिकारी हे वर नमूद केलेल्या कालावधीत अर्जित रजेवर गेले नसते तर ते त्याच पदावर स्थानापन्न म्हणून काम करीत राहिले असते.

संबधित न्यायिक अधिकारी यांनी त्यांचे पदभारासंबधी त्यांचे न्यायालयाशी संलग्न असलेल्या पोलीस ठाण्याला व तुरुंगाधिकारी यांना लेखी सूचना द्याव्यात. तसेच त्यांनी मुख्यालयात हजर झालेचे प्रतिवेदन जिल्हा न्यायालयाकडे पाठविणेचे आहे.

सदर आदेशाची नोंद संबंधित न्यायिक अधिकाऱ्यांचे सेवापुस्तकात घेण्यात यावी.

**एम. क्यु. एस. एम. शेख,**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
रत्नागिरी.

रत्नागिरी,
दिनांक २ जानेवारी २०२१.

## BY THE PRINCIPAL DISTRICT AND SESSIONS JUDGE, SINDHUDURG

### Office Order

No. Admn/115/2021.— Smt. D. K. Patil, Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Kankavli, is granted Earned leave for 15 days from 11th January 2021 to 25th January 2021 with permission to prefix holidays on 9th January 2021 and 10th January 2021 and suffix holidays on 26th January 2021 and to leave Head Quarters from 8th January 2021 A.O.H. to 27th January 2021 B.O.H..

Smt. D. K. Patil, Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Kankavli, is granted permission to attend flag-hoisting ceremony on 26th January 2021 at Court of Tal. Faltan, Dist. Satara.

No *locum tenens* is necessary.

On return from leave Smt. D. K. Patil, is reposted as Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C.. Kankavli.

Certified that, under note 2 below Rule 39 of M.C.S.(Pay) Rule, 1981. Smt. D. K. Patil, would have been continued to an officiate as Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C.. Kankavli had she not proceeded on leave as above.

During the abovesaid leave period of Smt. D. K. Patil, Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Kankavli, the charge of the Court of Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Kankavli shall remain with Shri. S. A. Jamadar, Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Kankavli.

The Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Kankavli is directed to hand over the charge of her Court to the Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Kankavli. The Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Kankavli, is directed to submit joining report to this office, in view of provisions contained in para 571 of Chapter XXX of Civil Manual.

Contents of this order be communicated to the officers concerned.

S. V. HANDE,
Principal District and Sessions Judge,
Sindhudurg.

Sindhudurg,
dated 5th January 2021.

## BY THE PRINCIPAL DISTRICT AND SESSIONS JUDGE, SINDHUDURG

### Office Order

No. Admn/113/2021.— Shri V. D. Patil, Civil Judge (J.D.) and J.M.F.C.. Vengurla is granted earned leave for 3 days from 6th January 2021 to 8th January 2021 with permission to leave headquarters from 5th January 2021 A.O.H. to 9th January 2021 B.O.H..

No *locum tenens* is necessary.

On return from leave Shri V. D. Patil, is re-posted as Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Vengurla.

Certified that, under note 2 below Rule 39 of M.C.S. (Pay) Rule, 1981, Shri V. D. Patil, would have been continued to an officiate as Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Vengurla had he not proceeded on leave as above.

During the abovesaid leave period of Shri. V. D. Patil, Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Vengurla, the charge of the Court of the Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Vengurla shall remain with Shri S. B. Patil, Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Kudal.

The Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Vengurla is directed to hand over the charge of his Court to the Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Kudal. He is also directed to submit joining report to this office, in view of provisions contained in para 571 of Chapter XXX of Civil Manual.

Contents of this order be communicated to the officers concerned.

S. V. HANDE,
Principal District and Sessions Judge,
Sindhudurg.

Sindhudurg,
dated 5th January 2021.

## BY THE PRINCIPAL DISTRICT AND SESSIONS JUDGE, SINDHUDURG

### Office Order

No. Admn/112/2021.— Granted commutted leave *ex-post-facto*, for 02 days on 4th January 2021 and 5th January 2021 to Shri. A. M. Phadatare, Civil Judge (S.D.) and Chief Judicial Magistrate, Sindhudurg.

No *locum tenens* is necessary.

On return from leave Shri. A. M. Phadatare is reposted as Civil Judge (S.D.) and Chief Judicial Magistrate, Sindhudurg.

Certified that, under note 2 below Rule 39 of M.C.S.(Pay) Rule 1981, Shri A. M. Phadatare, would have been continued to an officiate as Civil Judge (S.D.) and Chief Judicial Magistrate, Sindhudurg had he not proceeded on leave as above. ..

During the abovesaid leave period of Shri A. M. Phadatare, Civil Judge (S.D.) and Chief Judicial Magistrate. Sindhudurg, the administrative charge of the Court of the Chief Judicial Magistrate, Sindhudurg and the charge of the Court of the Civil Judge (S.D.) Sindhudurg was already kept with Smt. V. A. Patravale, *Ad-hoc* District Judge-1 and Assistant Sessions Judge. Sindhudurg and the charge of the remand work and urgent criminal matters of the Court of the Chief Judicial Magistrate, Sindhudurg was already kept with Shri S. B. Patil. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Kudal.

The Civil Judge (S.D.) and Chief Judicial Magistrate. Sindhudurg is directed to submit joining report to this olfice, in view of provisions contained in para 571 of Chapter XXX of Civil Manual.

Contents of this order be communicated to the officer concerned.

S. V. HANDE,
Principal District and Sessions Judge,
Sindhudurg.

Sindhudurg,
dated 6th January 2021.

## BY THE PRINCIPAL DISTRICT AND SESSIONS JUDGE, SINDHUDURG

### Office Order

No. Admn/124/2021.— Shri P. R. Kadam, District Judge-1 and Addl. Sessions Judge, Sindhudurg is granted commuted leave for 08 days from 5th January 2021 to 12th January 2021.

No *locum tenens* is necessary.

On return from leave Shri P. R. Kadam, is reposted as District Judge-1 and Addl. Sessions Judge, Sindhudurg.

Certified that, under note 2 below Rule 39 of M.C.S.(Pay) Rule 1981, Shri P. R. Kadam, would have been continued to an officiate as District Judge-1 and Addl. Sessions Judge, Sindhudurg had he not proceeded on leave as above.

During the abovesaid leave period of Shri P. R. Kadam, District Judge-1 and Addl. Sessions Judge, Sindhudurg, the charge of the Court of the District Judge-1 and Addl. Sessions Judge, Sindhudurg shall remain with Shri R. B. Rote, District Judge-2 and Addl. Sessions Judge, Sindhudurg.

The District Judge-1 and Addl. Sessions Judge, Sindhudurg is directed to hand over the charge of his Court to the District Judge-2 and Addl. Sessions Judge, Sindhudurg. He is also directed to submit joining report to this office, in view of provisions contained in para 571 of Chapter XXX of Civil Manual.

Contents of this order be communicated to the officers concerned.

S. V. HANDE,
Principal District and Sessions Judge,
Sindhudurg.

Sindhudurg,
Dated : 7th January 2021.

---

## BY THE PRINCIPAL DISTRICT AND SESSIONS JUDGE, SINDHUDURG

### Office Order

No. Admn/123/2021.— In view of application referred to at Sr. No.2 above, earned leave for 03 days i.e. from 6th January 2021 to 8th January 2021, already granted to Shri V. D. Patil. Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Vengurla, *vide* Office Order referred to at Sr. No. 1 above, is hereby cancelled.

Inform concerned accordingly.

S. V. HANDE,
Principal District and Sessions Judge,
Sindhudurg.

Sindhudurg,
Dated : 7th January 2021.

## विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई यांजकडून

**वाचावे.**—(१) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील जा.क्र.पतसंस्था/सआ-५/खर्च/वसुली आदेश/८७२/२०१८, दिनांक ६ एप्रिल २०१८.

(२) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील जा.क्र.पतसंस्था/सआ-५/वसुली अधिकारी नियुक्ती/फेर नियुक्ती/२०१८, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजीचे परिपत्रक..

(३) मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील क्र.पतसंस्था/स.आ.५/वसुलीअधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/१८५६/२०१९ दिनांक १९ जुलै २०१९ चे पत्र.

(४) अध्यक्ष श्री. समर्थ भंडारी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., चिपळूण यांचेकडील दिनांक २ नोव्हेंबर २०२० रोजीचा या कार्यालयास दिनांक ९ नोव्हेंबर २०२० रोजी प्राप्त प्रस्ताव.

### आदेश

क्रमांक विसनि/कोकण/वि-७/कलम १५६/श्री. समर्थ भंडारी ना पत/२३/सन २०२०.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६(१) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, आप्पाराव घोलकर, विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई या आदेशाद्वारे श्री. समर्थ भंडारी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., चिपळूण यांचेकडील या संस्थेच्या खालील अधिकाऱ्यांस त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६(१) व नियम १९६१ मधील नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार, खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२३ या कालावधीकरिता प्रदान करीत आहे.

| अ. क्र. | अधिकार प्रदान करावयाच्या अधिकाऱ्याचे नाव | हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री. संदिप विष्णु राऊत | संस्थेचे अधिकारी | विशेष वसुली व विक्री अधिकारी | संपूर्ण कोकण विभाग |

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ मधील नमूद तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व कलम ९८ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

(३) अधिकार प्रदान केलल्या व्यक्तीची बदली, सेवानिवृत्ती किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा मृत्यू झाल्यास अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(४) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(५) शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-१५०४/प्र.क्र.२३१/१५-स,दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये विशेष वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करणेस मनाई आहे.

(६) या आदेशान्वये नियुक्त वसुली अधिकारी यांनी " जप्त " केलेल्या मालमत्तेचा ताबा विक्री प्रमाणपत्र दिल्यानंतरच लिलाव खरेदीदारास देण्यात येईल. तो पर्यंत मालमत्ता केवळ जप्त करता येईल व ही जप्ती जारी ठेवताना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्याखालील नियमांचे पालन होणे आवश्यक आहे.

(७) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ नुसार वसुली अधिकारी यांना हुकूमनामा/वसूली दाखला यामधील वसूलपात्र रक्कम व उपरोक्त नमूद हुकूमनाम्याच्या/वसुली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (Cost of Process) या व्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम वसुली खर्च म्हणून थकबाकीदाराकडून वसूल करता येणार नाही.सदर खर्चाची आकारणी व विनियोग याबाबत प्रकरणनिहाय हिशोब ठेवावयाचा असून त्याची तपासणी संस्थेच्या वैधानिक लेखापरीक्षकांकडून करून घ्यावयाची आहे.

(८) वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर श्री. समर्थ भंडारी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, चिपळूण असा फलक लावता येऊ शकेल.

(९) संस्थेने याप्रमाणे वसुली केलेल्या खर्चाबाबत व त्याच्या विनियोगाबाबत प्रकरणनिहाय हिशोब ठेवणे बंधनकारक राहील. संस्थेच्या नियुक्त वैधानिक लेखापरीक्षकांना लेखापरीक्षण सुरू असताना पडताळणीसाठी/तपासणीसाठी सादर करणे बंधनकारक राहील.

(१०) वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त " आणि किंवा " सिव्हील कोर्ट " " एक्झीक्युटीव्ह कोर्ट " या शब्दाचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये) असे लिहावे.

(११) वसुली अधिकारी यांनी दरमहा विहित नमुन्यांत प्रपत्र १,२,३ व ५ प्रमाणे कर्ज वसुलीची माहिती संबंधित जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयास सादर करावी. ज्या सहकारी संस्थेचे कार्यक्षेत्र विभाग आहे त्यांनी देखील त्यांचे मुख्य कार्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे त्या जिल्हा उप निबंधक यांचे कार्यालयास माहिती सादर करावी.

(१२) वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रियीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१३) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील परिपत्रक दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ च्या परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची आहे सदर परिपत्रकातील सूचनांचे उल्लंघन झाल्यास वसुलीचे अधिकार काढून घेण्यात येऊन भविष्यकाळात असे अधिकार प्रदान केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(१४) वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीसा/आदेश/घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा.

(१५) संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापक यांनी प्रपत्र -४ मध्ये वसुली अधिकारी निहाय वसुली कामकाजाचा आढावा दर सहा महिन्यांनी या कार्यालयास समक्ष सादर करावा.

**आप्पाराव घोलकर,**
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
कोकण विभाग, नवी मुंबई.

नवी मुंबई,
दिनांक १० डिसेंबर २०२०.

## विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभाग नवी मुंबई यांजकडून

**वाचावे.—**(१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ (अद्ययावत सुधारणेसह)

(२) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे याचेकडील जा.क्र.ना.पत/डी-४/पतसंस्था/का.क.१५६/०७, दिनांक ३१ डिसेंबर २००७ रोजीचे परिपत्रक.

(३) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्र. प्रशासन/क.४९,१५६/वेतन कपाती/का.पध्दती/२००८, दि. १० डिसेंबर २००८.

(४) मा. सहकार आयुक्त व निबंधक, यांचेकडील जा.क्र.प्रशासन/वसुली अधिकारी/जप्त मालमत्ता/कब्जाबंदी/२००९, दिनांक २० मार्च २००९.

(५) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांचेकडील जा.क्र.ना.पत/डी-४ /पतसंस्था/का.क/१५६/११, दिनांक २१ नोव्हेंबर २०११ चे परिपत्रक.

(६) मा. सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कडील जा.क्र.पतसंस्था/सआ-५/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/९/२०१७, दिनांक १ जानेवारी २०१७.

(७) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील जा.क्र.पतसंस्था/सआ-५/खर्च/वसुली आदेश/८७२/२०१८, दिनांक ६ एप्रिल २०१८.

(८) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील जा.क्र.पतसंस्था/सआ-५/वसुली अधिकारी नियुक्ती/फेर नियुक्ती/२०१८, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजीचे परिपत्रक.

(९) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील क्र. पतसंस्था/स.आ.५/वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/१८५६/२०१९ दिनांक १९ जुलै २०१९ चे पत्र.

(१०) दि जव्हार अर्बन को-ऑप. बँक लि., जव्हार यांचेकडील दिनांक १४ जुलै २०२० रोजीचा या कार्यालयास दिनांक १ ऑक्टोबर २०२० रोजी प्राप्त प्रस्ताव.

### आदेश

क्रमांक विसनि/कोकण/वि-२/का.क १५६/जव्हार अर्बन बँक/८/२०२०.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, आप्पाराव घोलकर विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई या आदेशाद्वारे दि जव्हार अर्बन को.ऑपरेटिव्ह बँक लि., जव्हार यांचेकडील वाचले क्र. १० च्या प्रस्तावास अनुसरून संस्थेच्या थकीत कर्ज वसुलीसाठी सदर पतसंस्थेच्या खालील दर्शविलेल्या अधिकाऱ्यांस विशेष वसुली अधिकारी व विक्री अधिकारी म्हणून त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व (२) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चे नियम १०७, २ (एच) व (जे) तसेच नियम १०७, खालील उप-नियम (३) (५) (६) (७) (९) (१०) (११) व (अपसेट प्राईस निश्चित करण्याची तरतुद वगळून) नियम (१२) (१३) (१५) (१७) (१८) व (२०) नुसार दिलेल्या वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्यासाठी **दिनांक २६ ऑक्टोबर २०२० पासून दिनांक ३१ मार्च २०२३** पर्यंत कर्ज वसुली करावयाच्या कार्यवाहीपुरती खालील अटीस अधीन राहून शक्ती प्रदान करीत आहे :—

| अ. क्र. (१) | अधिकाऱ्याचे नाव (२) | हुद्दा (३) | शक्तीची व्याप्ती (४) | कार्यक्षेत्र (५) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. मधुकर त्रयंबक खंदारे | प्र. व्यवस्थापक | विशेष वसुली व विक्री अधिकारी. | कोकण विभागातील ठाणे व पालघर जिल्हा. |
| २ | श्री. मुरलीधर ग. शेवाळे | सिनिअर ऑफीसर | विशेष वसुली व विक्री अधिकारी. | कोकण विभागातील ठाणे व पालघर जिल्हा. |

**अटी.—**

(१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १९६१ चे नियम १०७ मधील नमूद तरतुदीनुसार कर्जवसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसूली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सुचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व कलम ९८ अन्वये प्राप्त वसूली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

(३) प्रस्तुत व्यक्तीची बदली, नियुक्ती किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा मृत्यू झाल्यास अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(४) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

(५) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये विशेष वसुली अधिकाऱ्यांनी तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करणेस मनाई आहे.

(६) वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अन्वये करावयाची कपातीची मागणी संस्थेने मालकाकडे करावयाची आहे. परस्पर बँकांशी संपर्क साधून वेतनाची रक्कम कपात करण्यात येऊ नये.

७) या आदेशान्वये नियुक्त वसुली अधिकाऱ्यांनी " जप्त " केलेल्या मालमत्तेचा ताबा विक्री प्रमाणपत्र दिल्यानंतरच लिलाव खरेदीदारास देण्यात येईल. तो पर्यंत मालमत्ता केवळ जप्त करता येईल व ही जप्ती जारी ठेवतांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्याखालील नियमांचे पालन होणे आवश्यक आहे. या काळात कर्जदारांस अशा मालमत्तेच्या ताब्यापासून वंचित ठेवता येणार नाही.

(८) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ नुसार वसूली अधिकारी यांना हुकूमनामा /वसुली दाखला यामधील वसुलपात्र रक्कम व उपरोक्त नमूद हुकूमनाम्याच्या/वसुली दाखल्याच्या आदेशिकेचा खर्च (Cost of Process) या व्यतिरिक्त इतर कोणतीही रक्कम वसुली खर्च म्हणून थकबाकीदाराकडून वसूल करता येणार नाही.सदर खर्चाची आकारणी व विनियोग याबाबत प्रकरणनिहाय्य हिशोब ठेवावयाचा असून त्याची तपासणी संस्थेच्या वैधानिक लेखापरीक्षकांकडून करून घ्यावयाची आहे.

(९) वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर " दि जव्हार अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., जव्हार " असा फलक लावता येऊ शकेल.

(१०) संस्थेने याप्रमाणे वसुली केलेल्या खर्चाबाबत व त्याच्या विनियोगाबाबत प्रकरणनिहाय हिशोब ठेवणे बंधनकारक राहील. संस्थेच्या नियुक्त वैधानिक लेखापरीक्षकांना लेखापरीक्षण सुरू असताना पडताळणीसाठी/तपासणीसाठी सादर करणे बंधनकारक राहील.

(११) वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त " आणि किंवा " सिव्हील कोर्ट " " एक्झीक्युटीव्ह कोर्ट " या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्याऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये) असे लिहावे.

(१२) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील परिपत्रक दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ च्या परिपत्रकातील सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची आहे. सदर परिपत्रकातील सुचनांचे उल्लंघन झाल्यास वसुलीचे अधिकार काढून घेण्यात येऊन भविष्यकाळात असे अधिकार प्रदान केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(१३) वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीसा/आदेश/घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा.

(१४) संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापक यांनी प्रपत्र -४ मध्ये वसुली अधिकारी निहाय वसुली कामकाजाचा आढावा दर सहा महिन्यांनी या कार्यालयास सादर करावा.

सदरचे आदेश दिनांक २६ ऑक्टोबर २०२० पासून अंमलात येतील.

**आप्पाराव घोलकर,**
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
कोकण विभाग, नवी मुंबई.

## पोलीस आयुक्त कार्यालय ठाणे शहर यांजकडून

### मनाई आदेश

क्रमांक वि.शा./मकर संक्रांत/मनाई आदेश/२१०/२०२१.— ज्याअर्थी, मकर संक्रात सणानिमित्त ठाणे शहरात उडविल्या जाणाऱ्या पतंगांना वापरण्यात येणारा मांजा (दोरा) हा काही ठिकाणी नायलॉन दोऱ्याचा असल्याचे निदर्शनास आले आहे. मकर संक्रांत सणाच्या निमित्त पंतग उडविण्याचे प्रकार जास्त प्रमाणात असते व मोठ्याप्रमाणात नायलॉन मांजा, काचेचा वापर करण्यात आलेला धागा यांचा वापर होतो. पंतग उडविताना तसेच दोन पतंगामध्ये पेज झाल्याने (दोऱ्याचे ) घर्षण होऊन मोठ्याप्रमाणात मांजा तुटून उंच झाडे व इमारतीमध्ये अडकतो. त्यामुळे वन्य पक्षी यांचे जीवितास धोका निर्माण होऊन वन्य पशुपक्षी जखमी होण्याचे प्रमाण व प्राण गमविण्याचे प्रकार घडत आहेत. पतंगाच्या मांज्यामुळे रस्त्यावर जाणारे दुचाकी वाहनावरील स्वार व शाळेतील विद्यार्थी, पतंगाच्या मागे धावणारे इत्यादी यांचा अपघात होऊन त्यात ते जखमी होणे व जीवीतहानी होणे असे प्रकार या मांजामुळे घडू शकतात. नायलॉनचा मांजा लवकर तुटत नाही व त्यांचा नाशही होत नाही. तो पर्यावरणास हानिकारक ठरत आहे.

२. त्याअर्थी, मी विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, ठाणे शहर तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणून शासनाच्या दिनांक १ एप्रिल १९७४ चे अधिसूचनेद्वारे प्राधिकृत अधिकारी, म्हणून ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदार प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून असा आदेश देत आहे की, खबरदारीचा उपाय म्हणून पतंग उडविणेसाठी वापरण्यात येणाऱ्या मांजासाठी नायलॉन दोरा व ज्या माजांस काचेची कोटिंग आहे त्याची विक्री, साठा व वापर यावर बंदी घालत आहे.

३. सदर आदेश हा दिनांक १४ जानेवारी २०२१ चे ००-०१ ते ३१ जानेवारी २०२१ चे २४-०० वा.चे दरम्यान लागू करीत आहे.

४. सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.

५. सर्व संबंधितांना स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, पोलीस स्टेशन, सहा.पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पो.उप आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

६. सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक १३ जानेवारी २०२१ रोजी दिलेला आहे.

**विवेक फणसळकर,**
पोलीस आयुक्त, ठाणे शहर.

## पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांजकडून

### आदेश

क्रमांक विशा./ग्रापनि/निवडणूक/मनाई आदेश/०२/२०२१.— ज्याअर्थी, उपोद्घातातील अ. क्र. (१) मधील अधिसुचनेनुसार महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने, माहे एप्रिल व डिसेंबर २०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच, नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता कार्यक्रम जाहीर झालेला असून आदर्श आचारसंहिता दिनांक ११ डिसेंबर २०२० रोजी मध्यरात्री १२-०० वाजल्यापासून लागू झालेली असून सदस्य पदांच्या निवडणुकांकरीता कार्यक्रम जाहीर झालेला आहे. दिनांक १५ जानेवारी २०२१ रोजी मतदान होणार असून दिनांक १८ जानेवारी २०२१ रोजी मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

आणि ज्याअर्थी, ग्रामपंचायत निवडणूक मतदान केंद्र व मतमोजणी केद्रांवर शांतता व सुरक्षितता राखण्याच्या दृष्टीने सदर ठिकाणी योग्य तो प्रतिबंधात्मक आदेश लागु करणे क्रमप्राप्त वाटते.

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीत मी, विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, ठाणे मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १४४ (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून **ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-२ भिवंडी अंतर्गत नारपोली पो.स्टे. हद्दीतील** (१) दापोडे, (२) अलिमघर, (३) दिवे-अंजुर, (४) सुरई सारंग, (५) वळ, (६) पुर्णा, (७) काल्हेर, (८) भरोडी, (९) गुंदवली, (१०) मानकोली, (११) ओवळी, (१२) अंजुर, (१३) **वेहळे, कोनगाव पो. स्टे. हद्दीतील** (१) सरवली, (२) पिंपळनेर, (३) पिंपळास, **परिमंडळ-३ कल्याण अंतर्गत मानपाडा पो.स्टे हद्दीतील** (१) खोणी वडवली, (२) वडवली, **शिरढोण परिमंडळ-४ उल्हासनगर अंतर्गत हिललाईन पो.स्टे हद्दीतील** (१) पोसरी, (२) खरड, (३) मांगरूळ, (४) नेवाळी, (५) उसाटणे, (६) बुर्दुल, (७) हाजीमलंग वाडी, (८) नाऱ्हेण, **शिवाजीनगर पो.स्टे हद्दीतील** (१) काकोळे या ग्रामपंचायत निवडणूक असलेल्या कार्यक्षेत्रातील मतदान केंद्र तसेच **शांतीनगर पो.स्टे, खडकपाडा पो.स्टे व अंबरनाथ पो. स्टे हद्दीतील मतमोजणी केंद्र इमारतींच्या सभोवतालच्या १०० मीटर परिसरात** खालील व्यक्तींशिवाय अन्य व्यक्तींस प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे :—

(१) नियुक्त केलेले निवडणूक निर्णय अधिकारी/निरीक्षक,

(२) मतदान/मतमोजणी अधिकारी/कर्मचारी,

(३) मतदार (मतदानाचे दिवशी),

(४) प्रत्येक उमेदवार त्यांचे सोबत एका वेळी एकच निवडणूक प्रतिनिधी,

(५) निवडणुकीशी संबंधित कामावर असलेले अधिकारी व कर्मचारी,

(६) मतदारांचे कडेवर असलेले लहान मुल (मतदानाचे दिवशी),

(७) ज्या व्यक्तीस मदतीशिवाय चालता येत नाही किंवा मत देता येत नाही अशा अंध किंवा अपंग व्यक्तीला सोबत करणारी व्यक्ती (मतदानाचे दिवशी).

तसेच (१) मतदान केंद्रांचे (इमारतीचे) पासून १०० मीटर परिसराचे आतील सर्व व्यावसायिक दुकाने, रेस्टॉरन्ट, टपऱ्या, स्टॉल (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना बंद ठेवाव्यात.

(२) मतदान केंद्रांपासून १०० मीटरच्या आतील परिसरात मोबाईल, फोन, पेजर, कॉडलेस फोन इतर इलेक्ट्रॉनिक वस्तू इत्यादी नेण्यास प्रतिबंध जाहीर केला आहे.

(३) विविध पक्षांचे कार्यकर्त्यांचे निवासस्थाने १०० मीटर आतील परिसरात असल्यास त्या ठिकाणी राहणारे कुटूंब व इतरांनी प्रचार करणे, बैठक घेणे, मतदान केंद्रांवर येणाऱ्या मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी कोणतेही कृत्य करण्यासाठी एकत्र जमणे व तसे कृत्य करू नये.

(४) शस्त्र परवाना धारकांनी त्यांची शस्त्रे मतदान केंद्रांपासून १०० मीटरच्या आत घेऊन जाऊ नयेत. सदरचा आदेश ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-२ भिवंडी, परिमंडळ-३ कल्याण, परिमंडळ-४ उल्हासनगर अंतर्गत ग्रामपंचायत निवडणूक असलेल्या कार्यक्षेत्रातील मतदान केंद्र व मतमोजणी केंद्र हद्दीतील इमारतींच्या परिसरात दिनांक १४ जानेवारी २०२१ रोजी ००-०१ पासून ते दिनांक २१ जानेवारी २०२१ रोजी २४-०० वाजेपर्यंत अथवा मतमोजणी प्रकिया संपुष्टात येईपर्यंत अंमलात राहील.

उपरोक्त मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल.

सदरचा आदेश दिनांक १३ जानेवारी २०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला आहे.

**विवेक फणसळकर,**
पोलीस आयुक्त, ठाणे शहर.

## पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांजकडून

### आदेश

क्रमांक विशा./ग्रा.पं.नि/निवडणूक/मनाई आदेश/०१/२०२१.— ज्याअर्थी, उपोद्घातातील अ. क्र. (१) मधील अधिसुचनेनुसार महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने, माहे एप्रिल व डिसेंबर २०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच, नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता कार्यक्रम जाहीर झालेला असून आदर्श आचारसंहिता दिनांक ११ डिसेंबर २०२० रोजी मध्यरात्री १२.०० वाजल्यापासून लागू झालेली असून दिनांक २३ डिसेंबर २०२० ते दिनांक ३० डिसेंबर २०२० या कालावधीत नामनिर्देशनपत्र दाखल करणे व दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजी नामनिर्देशनपत्राची छानती होऊन दिनांक ४ जानेवारी २०२१ रोजी पर्यंत, नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक असून, निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक ४ जानेवारी २०२१ रोजी दिनांक १५ जानेवारी २०२१ रोजी मतदान व दिनांक १८ जानेवारी २०२१ रोजी मतमोजणी होऊन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक २१ जानेवारी २०२१ रोजी पूर्ण होणार आहे.

त्या अनुषंगाने विविध राजकीय पक्ष प्रचारासाठी झेंडे उभारणे, बॅनर्स, कापडी फलक, पोस्टर लावणे, नोटीसा चिटकविणे, घोषणा लिहिणे, कमान, पताका, कटआउट लावणे किंवा चिन्हे वापरतात, त्यामुळे अनेक वेळा दोऱ्या, काठ्या व तत्सम भाग रस्त्यावर आडवा येऊन रहदारीस अडथळा होतो. ज्याअर्थी प्रचाराचे कालावधीत अशा किरकोळ कारणावरून वाद निर्माण होऊन पक्ष कार्यकर्त्यांमध्ये असंतोषाचे वातावरण तयार होते त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन सार्वजनिक शांततेचा भंग होऊ शकतो.

त्याअर्थी, ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-१ ठाणे अंतर्गत शिळ-डायघर पोलीस ठाणे हद्दीतील (१) नागाव, (२) नारीवली, (३) दहीसर, (४) पिंपरी, (५) वाकळन, परिमंडळ-२ भिवंडी अंतर्गत नारपोली आणि कोनगाव पोलीस ठाणे हद्दीतील (१) दापोडे, (२) अलिमघर, (३) दिवे-अंजुर, (४) सुरई सारंग, (५) वळ, (६) पुर्णा, (७) काल्हेर, (८) भरोडी, (९) गुंदवली, (१०) मानकोली, (११) ओवळी, (१२) अंजुर, (१३) वेहळे, (१४) सरवली, (१५) पिंपळनेर, (१६) पिंपळास, परिमंडळ-३ कल्याण अंतर्गत मानपाडा पोलीस ठाणे हद्दीतील (१) खोणी वडवली, (२) वडवली शिरढोण ग्रा.पंचायत, परिमंडळ-४ उल्हासनगर अंतर्गत हिललाईन आणि शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील (१) पोसरी, (२) खरड, (३) मांगरूळ, (४) नेवाळी, (५) उसाटणे, (६) बुर्दुल, (७) हाजीमलंग वाडी, (८) नाऱ्हेण, (९) काकोळे या ग्रामपंचायत निवडणूक असलेल्या कार्यक्षेत्रात निवडणुकीच्या अनुषंगाने जनजीवन सुरळीत राहण्यासाठी सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था जोपासण्यासाठी तसेच कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन सामाजिक तेढ निर्माण होऊ नये म्हणून **मी, विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, ठाणे शहर,** सन १९५१ चा कायदा महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून निवडणूक कार्यक्षेत्रात महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३ (१) (प) अन्वये रहदारीस अडथळा होईल किंवा उजेड व हवा निर्वेभितपणे येणास प्रतिबंध होईल अशा रितीने कोणत्याही सार्वजनिक रस्ता व सार्वजनिक जागेवर बॅनर्स लावणे, फलक लावणे, खांबावर झेंडे लावणे यांस या ठाणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ-१ ठाणे अंतर्गत शिळ-डायघर पोलीस ठाणे हद्दीतील (१) नागाव, (२) नारीवली, (३) दहीसर, (४) पिंपरी, (५) वाकळन, परिमंडळ-२ भिवंडी अंतर्गत नारपोली आणि कोनगाव पोलीस ठाणे हद्दीतील (१) दापोडे, (२) अलिमघर, (३) दिवे-अंजुर, (४) सुरई सारंग, (५) वळ, (६) पुर्णा, (७) काल्हेर, (८) भरोडी, (९) गुंदवली, (१०) मानकोली, (११) ओवळी, (१२) अंजुर, (१३) वेहळे, (१४) सरवली, (१५) पिंपळनेर, (१६) पिंपळास, परिमंडळ-३ कल्याण अंतर्गत मानपाडा पोलीस ठाणे हद्दीतील (१) खोणी वडवली, (२) वडवली, शिरढोण ग्रा.पंचायत, परिमंडळ-४ उल्हासनगर अंतर्गत हिललाईन आणि शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील (१) पोसरी, (२) खरड, (३) मांगरूळ, (४) नेवाळी, (५) उसाटणे, (६) बुर्दुल, (७) हाजीमलंग वाडी, (८) नाऱ्हेण, (९) काकोळे या ग्रामपंचायत निवडणूक कार्यक्षेत्रात निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंतच्या कालावधीसाठी मी प्रतिबंध करीत आहे.

सदर ग्रामपंचायत निवडणुकीचे काळात कोणत्याही उमेदवाराने खाजगी इमारत अथवा आवारात पोस्टर्स, झेंडे, बॅनर्स, कापडी फलक लावणे नोटीसा चिटकविणे, घोषणा लिहिणे इत्यादीचा वापर करावयाचा असल्यास त्यांनी प्रथम जागा मालकाची लेखी परवानगी घेणे बंधनकारक आहे. अशी लेखी परवानगी संबंधित पोलीस स्टेशनला दाखवून पोलिसांचा ना हरकत दाखला घेणे देखील बंधनकारक राहील अशा रितीने खाजगी जागेवर लावलेले बॅनर्स, पोस्टर्स इत्यादीमुळे रहदारीस अडथळा होणार नाही व उजेड हवा अडवली जाणार नाही हे पाहणे त्या उमेदवाराला बंधनकारक राहील.

मी सूचना देतो की, सदरहू आदेशाच्या प्रती निवडणूक कार्यक्षेत्रात सहज दिसणाऱ्या सार्वजनिक ठिकाणी चिटकवून ध्वनीक्षेपकाद्वारे सदर आदेश प्रसारीत करावा व तशा नोंदी घेण्यात याव्यात.

सदर मनाई आदेश दिनांक ४ जानेवारी २०२१ रोजी ००-०१ वा. पासून ते दिनांक २१ जानेवारी २०२१ रोजी २४-०० वा. पावेतो लागू राहील. सदर मनाई आदेशाचा भंग करणाऱ्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १३१ प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

सदर आदेश आज दिनांक २ जानेवारी २०२१ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी जारी केलेला आहे.

**विवेक फणसळकर,**
पोलीस आयुक्त, ठाणे शहर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.